'मि' प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** विमानतळ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0022 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/01/2026 01:12

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 29/01/2026
**Date To ( दिनांक पर्यत):** 29/01/2026
**Time From (वेळेपासून):** 12:28 बजे
**Time To (वेळेपर्यत):** 16:51 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/01/2026 **Time (वेळ):** 00:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/01/2026 00:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** साई झेरॉक्स सेंन्टर,ग्यानमाता शाळेजवळ,नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सुरेश सोपानराव बनसोडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक,नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक ,विभाग नांदेड,विमानतळ, नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक,नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक ,विभाग नांदेड,विमानतळ, नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9921771400

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | साहेबराव नागोराव गुंडीले | | | 1. विमानतळ रोड,माता गुजरीजी चौक,,बजरंग कॉलनी, नांदेड, विमानतळ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

**S.No.** **UIDB Number**
(अ.क्र.) (यु.आय.डी.बी.क्र.)

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 29/01/2026

मी सुरेश सोपानराव बनसोडे, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मोबाईल क्रमांक 9921771400

सरकार तर्फे फिर्यादी होवून लेखी फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे सुमारे 08 महिन्यापासून पोलीस निरीक्षक (एक टप्पा पदोन्नती) म्हणून कार्यरत आहे.

दि. 28/01/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट कार्यालयात हजर असतांना प्रभारी अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार साहेब, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी त्यांचे कक्षात बोलावून तक्रारदार बाळु माणिकराव सुर्यवंशी, वय 46 वर्ष व्यवसाय शेतमजुरी, रा. वाईफनी, ता. माहुर, जि. नांदेड यांची तक्रार नोंदवुन पुढील कारवाई करणे बाबत आदेशीत केले.

त्यावरून आम्ही तक्रारदार श्री बाळु माणिकराव सुर्यवंशी, यांना विचारपुस केली. तेव्हा तक्रारदार यांनी कळविले की, मला दोन मुली नामे 1. देविका बाळु सुर्यवंशी, 2. राधिका बाळु सुर्यवंशी अशा असून दोन्ही मुलींचे शिक्षण चालु आहे. मी दिनांक 29/04/2025 रोजी माझे दोन्ही मुलींचे पुढील शिक्षणाकरीता कुणबी मराठा या जातीचे जात वैधता प्रमाणपत्र काढण्यासाठी फाईल तयार करून जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समीती, नांदेड येथे दाखल केलेल्या आहेत.

या फाईल दाखल केल्यानंतर मी जेव्हा जेंव्हा माझे देवीका या मुलीचे मोबाईल क्रमांक 9021245506 या क्रमांकावर फाईल बाबत मेसेज येतो त्या त्या वेळी मी स्वतः समाजकल्याण ऑफीस नांदेड आवार जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी विभाग येथे जात होतो. तरी दोन ते तीन वेळेस जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी विभाग नांदेड येथे हेंगडे साहेब पद माहीत नाही यांना भेटून माझे दोन्ही मुलींचे जातीचे प्रमाणपत्र मिळणे बाबत विनंती केली. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, तुमच्या मुलींचे जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी एक दक्षता समिती असते ज्यामध्ये तीन सदस्य असतात. तुमच्या फाईलची चौकशी चालु आहे. दक्षता समिती प्रत्येक महिन्याला मिटींग घेवून ठरवित असते व प्रत्येक मिटींगबाबतचे मॅसेज रजिस्टर मोबाईलवर येत असतात असे त्यांनी सांगितले.

त्यानंतर दिनांक 21/01/2026 रोजी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी विभाग नांदेड येथे हजर राहणेबाबत माझी मुलगी देविका हीचे मोबाईलवर मॅसेज आला होता. त्याप्रमाणे मी दिनांक 21/01/2026 रोजी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी विभाग नांदेड येथे गेलो होतो. त्यावेळी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी विभाग नांदेड येथे दक्षता समितीची मिटींग झाली होती. त्या दक्षता समितीमध्ये तीन जण होते व त्यापैकी एक हेंगडे साहेब असून त्यांचेसोबतचे दोन जणांचे नाव मला माहिती नाही. त्यावेळी समीतीसमोर सुनावणीच्या वेळी मला समीती समक्ष बोलाविले. त्यावेळी हेंगडे यांनी मला उत्तमराव भिमराव सुर्यवंशी हे कोण आहेत असे विचारले, तेव्हा मी त्यांना माझे काका आहेत असे सांगितले. तेव्हा त्यांनी मला तुम्ही उत्तमराव भिमराव सुर्यवंशी यांचे नावाची 7/12 घेवून या असे सांगुन माझे दोन्ही फाईल बाजूला ठेवल्या. तेव्हा मी त्यांना 7/12 कधी आणायची असे विचारले असता, त्यांनी तुम्हाला तुमचे मोबाईलवर मॅसेज येईल तेव्हा घेवून या असे सांगितले. त्यानंतर मी समाजकल्याण ऑफीसचे आवारात असताना एक इसम भेटला. त्याने मला तूम्ही या कार्यालयात ब-याचवेळा दिसता असे सांगून बोलण्यास सुरूवात केली. त्याने आपले नाव साहेबराव गुंडीले असे सांगून मला माझे कामाविषयी विचारणा केली. त्यावेळी मी त्याला माझ्या मुलींचे कुणबी या जातीचे जात वैधता प्रमाणपत्र काढण्याकरीता आलो असे सांगितले. त्यावेळी त्याने मला सांगितले की समाज कल्याण कार्यालय, नांदेड कार्यालया शेजारी एक साई झेरॉक्स नावाचे झेरॉक्स दुकान आहे तिथे येवून मला भेटा. मी त्याप्रमाणे लगेच तिथे गेलो असता साहेबराव गुंडीले हे मला भेटले व त्यांनी मला सांगितले की, तुम्हाला प्रमाणपत्र काढायचे असेल तर मी साहेबाला बोलतो. यापुर्वी बरीच अशी कामे केलेली आहेत, तुमचे

किती प्रमाणपत्र आहे असे विचारले, तेव्हा मी त्यांना माझे दोन्ही मुलींचे जातीचे प्रमाणपत्र काढायचे आहे असे सांगुन त्यांना माझेकडील पावती दाखविली. तेव्हा त्यांनी मला दोन जातीचे प्रमाणपत्र काढायचे असेल तर 50,000/- रूपये लागतात व एक जातीचे प्रमाणपत्र काढायचे असेल तर 30,000/- रूपये लागतात असे सांगितले. तेव्हा मी त्यांना इतके पैसे नाहीत माझेकडे असे म्हणालो. तेव्हा त्यांनी ठिक आहे मी साहेबाला बोलून घेतो व तुम्हाला नंतर कळवितो असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना कोणत्या साहेबांना विचारणार आहात आणि माझे काम कोणते साहेब करणार आहे असे विचारले तेव्हा त्यांनी मी काम करणार असून मी तुमच्या कामाबद्दल एका साहेबांशी बोलणार आहे असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना खोदून नाव विचारले पण त्यांनी मला नाव सांगितले नाही. त्यानंतर एकमेकास आपले फोन नंबर देवून मी निघून आलो.

त्यानंतर दिनांक 26/01/2026 रोजी मी गावाकडे असतांना मला माझे मोबाईलवर साहेबराव गुंडीले याचा त्यांचा मोबाईल क्रमांक 9172536999 वरून फोन आला व त्यांनी मला सांगितले की, मी साहेबाला बोललो, तुम्ही लवकर पैसे घेवून या नांदेडला, तुमची फाईल फेटाळली जावू नये असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना इतक्या पैश्यांची जोड लावायला वेळ लागेल, तेव्हा ते मला म्हणाले की, तुम्हाला एक अर्जट मध्ये पाहिजे तर 30,000/- रुपये द्या आणि एकाच आता करून घ्या व दुस-याचे नंतर आरामाने कधी पण करून घ्या असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना उद्या येतो असे सागितले.

तरी मी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी विभाग येथे नांदेड येथे माझे दोन्ही मुलीचे कुणबी मराठा या जातीचे जात वैधता प्रमाणपत्र काढण्यासाठी दोन फाईल दाखल केल्या आहेत. समाज कल्याण कार्यालय, नांदेड येथील खाजगी इसम साहेबराव गुंडीले हे मला माझी मुलगी देविका बाळु सुर्यवंशी हीचे जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी 30,000/- रूपयाची किंवा दोन्ही मुलीचे जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी 50,000/- रूपयाची मागणी करीत आहेत. सदरची रक्कम ही कोणतीही शासकीय फि नसून ती लाच असल्याची माझी खात्री झाली आहे.

खाजगी इसम साहेबराव गुंडीले हे मागणी करीत असलेले 30,000/- रुपये हे लाच असल्याची माझी खात्री झाली असून ती मला देण्याची ईच्छा नाही. साहेबराव गुंडीले यांचेसोबत माझी वैर दुश्मनी नाही किंवा माझे त्यांचेसोबत पैसे देण्याघेण्याचा कोणताही व्यवहार नाही.

मी दिनांक 28/01/2026 रोजी मी साहेबराव गुंडीले यांनी भेटायला बोलाविल्याप्रमाणे त्यांना भेटायला जाणार होतो. परंतू मा. उपमुख्यमंत्री यांचे अपघाती निधन झालेने सर्व शासकिय कार्यालयांना सुट्टी दिलेने आज ते भेटणार नाहीत. तरी उदया दिनांक 29/01/2026 रोजी मी त्यांना भेटायला जाणार आहे. त्यांनी मला माझे मुलीचे जातीचे जात वैधता प्रमाणपत्र काढून देण्यासाठी 30,000/- रूपयाची लाचेची मागणी करून स्वतःसाठी व जात पडताळणी कार्यालयातील इतर अधिकारी यांचेकरीता किंवा इतरामार्फत स्विकारल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी ही विनंती. वगैरे प्रमाणे तक्रार दिली आहे.

त्यानंतर आमचेकडे हजर असलेले महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, नांदेड विभाग, नांदेड आगार येथील दोन शासकीय पंच 1) कुलदिप हिरासिंग चव्हाण, पद - चालक, नेमणुक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, नांदेड विभाग, नांदेड आगार, 2) रविचंद्र विश्वनाथ पांडागळे, पद वाहक, नेमणुक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, नांदेड विभाग, नांदेड आगार यांना लाचमागणी पडताळणी व सापळा कार्यवाहीत वापरण्याचे ठरले.

त्यानंतर सापळा पथकातील सदस्य आम्ही, पोहेकॉ/1082 यशवंत दाबनवाड, पोहेकॉ/158 मेकाले, पोकॉ/186 सय्यद खदिर व वरील दोन पंच आणि तक्रारदार बाळु माणिकराव सुर्यवंशी असे आमच्या कक्षात हजर आले. दोन्ही पंचासमोर तक्रारदार यांनी परत तक्रारीचे तोंडी कथन केले. त्यानंतर दोन्ही पंचानी तक्रारदार यांनी दिनांक 28/01/2026 रोजी दिलेली लेखी तक्रार व तोंडी कथन करत असलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्याने त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या. ज्यावर आम्ही व तक्रारदार यांनी यापूर्वीच सहया केल्या होत्या. त्यानंतर आम्ही पंच, तक्रारदार असे सर्वोनुमते लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोकॉ/सय्यद खदिर यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. त्यानंतर पोकॉ/सय्यद खदिर यांनी आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर आम्ही तक्रारीतील नमुद खासगी इसम कुठे भेटतील असे मुळ तक्रारदार यांना विचारले असता त्यांनी कळविले की, खासगी इसम साहेबराव गुंडीले हे त्यांचे ग्यानमाता शाळेजवळ साई झेरॉक्स दुकान येथे भेटतील असे सांगीतले. त्यावरून आम्ही तक्रारदार यांना लाच मागणी पडताळणी कारवाईसाठी पाठविण्याचा निर्णय घेतला. पोकॉ/ सय्यद खदिर यांना सुचना केली की, तक्रारदार यांचे गळयात व्हाईस रेकॉर्डर चालु करून खासगी इसम साहेबराव गुंडीले यांची भेट घेण्यासाठी पाठवावे. आमचे सुचने प्रमाणे पोकॉ/ सय्यद खदिर यांना त्यांचे खाजगी मोटार सायकलने व तक्रारदार व पंच यांना पंचाचे मोटार सायकलने ग्यानमाता शाळेजवळ जावुन तेथुन तक्रारदार व पंच

क्रमांक 1 यांना खाजगी इसम साहेबराव गुंडीले यांची भेट घेण्यासाठी रवाना करावे अशी सुचना केली त्यावरून पोकॉ/खदीर, तक्रारदार व पंच क्र.1 असे लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय ,नांदेड येथुन 12.10 वा रवाना झाले. त्यानंतर ग्यानमाता शाळेजवळुन वेळ 12.28 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांचे गळयात लटकावुन देवून तक्रारदार व पंच क्र. 01 कुलदिप हिरासिंग चव्हाण यांना खाजगी इसम साहेबराव गुंडीले यांची भेट घेण्यासाठी खाजगी इसम साहेबराव गुडीले याचे साई झेरॉक्स सेन्टर येथे रवाना केले. वेळ 12.53 वाजता तक्रारदार व पंच क्र. 01 असे पोकॉ/खदीर थाबलेल्या ठिकाणी परत आले. तेव्हा पोकॉ/खदीर यांनी तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर बंद केले व तक्रारदार, पंच क्र.1 व पोकॉ/खदीर असे लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय, नांदेड येथे 13.10 वा. परत आले..

त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच क्र. 01 यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की, खाजगी इसम साहेबराव गुंडीले हे ग्यानमाता शाळेजवळ साई झेरॉक्स या त्यांचे दुकानात हजर असल्याने मी व पंच क्र. 1 असे सरळ त्यांचे दुकानात जावून बोललो, तेव्हा त्यांनी सांगितले की, '' एकाची लावली का दोनची सोय लावली.........दोघीचे पन्नास हजार रूपये ....तेव्हा तक्रारदार यांनी एकाचे असे विचारणा करता खाजगी इसम गुंडीले यांनी 30-30 हजार असे सांगीतले. व दोघ एकाच घरात असल्यामुळ 25-25 .....तीतल्या ऑफीसवर थोडी पकड हाय आपली वचक हाय...... जे तेथे हाय तेच सांगायलो......लईच झाल तर आपल्याला हजार दोन हजार मिळतात तेवढयाच साठी काम करतो......तुमच निघजे कोणा मला चार चेकरा माराव लागतात.......ते काम करण गेले तर पैसे आणुन देवुन टाकतो......एका मिनटात पैसे परत देण्याची तयारी हाय......काम व्हयना झाल तर....... मी लई जनाचे काम केलेले आहेत. असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी एक करून टाका एकाचे किती घ्यावे लागतील असे विचारणा करता खाजगी इसम साहेबराव गुंडीले यांनी 25 हजार दयावे लागतील '' असे म्हणून लाचेची मागणी केल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व खाजगी इसम साहेबराव गुंडीले यांची भेटी दरम्यान डिजीटल व्हॉस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यावरून तक्रारदार, पंच क्र 1 हे सांगत असलेली हकीकत व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण एकच असल्याचे निष्पन्न झाले. तरी खाजगी इसम साहेबराव गुंडीले यांनी तक्रारदार यांचे दोन मुलीचे जातीचे प्रमाणपत्र काढायचे असेल तर 50,000/- रूपये लागतात व एक जातीचे प्रमाणपत्र काढायचे असेल तर 25,000/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन एक जातीचे प्रमाणपत्र काढण्यास काढण्यासाठी 25000/- रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानतर लाच स्विकृती सापळा कार्यवाही करण्याचे ठरले.

तक्रारदार यांनी त्यांचे जवळील 25000/- रूपये रक्कम ( ज्यात पाचशे रुपये दराच्या 50 भारतीय चलनी नोटा ) पंचासमक्ष हजर केल्या. पोहेकॉ/दाबनवाड यांनी लाच रक्कम 25000/- रूपये रकमेच्या भारतीय चलनी नोटांना ॲंथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे पॅन्टच्या उजव्या खिशात अलगद ठेवून दिले.

त्यानंतर तक्रारदार यांना खाजगी इसम साहेबराव गुंडीले यांची भेट घेण्यासाठी त्यांचे गळयात 16ः04 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून गळयात अडकावून पंच क्र. 1 कुलदिप हिरासिंग चव्हाण यांच्यसोबत ग्यानमाता शाळेजवळ खाजगी इसम यांचे साई झेरॉक्स सेंन्टर या दुकान येथे रवाना केले. त्यानंतर त्यांच्या पाठोपाठ आम्ही व सापळा पथक त्यांच्यावर नजर ठेवून त्यांच्या मागे मागे ग्यानमाता शाळेजवळ खाजगी इसम यांचे साई झेरॉक्स सेंन्टर येथे गेलो. त्यानंतर पंच क्र.1 कुलदिप चव्हाण हे 16.49 वाजता खाजगी इसम यांचे साई झेरॉक्स सेंन्टर या दुकानाचे बाहेर आले व खाजगी इसम साहेबराव गुंडीले यांनी लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर आम्ही व सापळा पथक तात्काळ ग्यानमाता शाळेजवळ खाजगी इसम साहेबराव गुंडीले यांचे साई झेरॉक्स सेंन्टर येथे गेलो असता, त्याठिकाणी खाजगी इसम साहेबराव गुंडीले हे त्यांचे खुर्चीवर बसलेले होते. तेव्हा आम्ही त्यांना आमचा परिचय देवून त्यांच्यावर ॲन्टी करप्शनची कारवाई झाल्याचे कळविले. तेव्हा आम्ही पंच क्र. 2 यांना खाजगी इसम साहेबराव गुंडीले यांच्या टेबलचे ड्रॉव्हरमध्ये ठेवलेले ॲन्थ्रॉसिन पावडरयुक्त 25000/- रूपये लाचेची रक्कम मिळून आल्याचे दाखवून ती हस्तगत केली. त्यानंतर खाजगी इसम साहेबराव गुंडीले यांना ताब्यात घेवुन सापळा पथकासह लाचलुचपत प्रतिबंध विभाग, नांदेड येथे हजर आलो.

तरी तक्रारदार बाळु माणिकराव सुर्यवंशी, वय 46 वर्ष, व्यवसाय शेतमजुरी, रा. वाईफनी, ता. माहुर, जि. नांदेड यांनी दिनांक 28/01/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे तक्रार दिली होती. त्यावरून दिनांक 29/01/2026 रोजी 12.28 ते 16.51 वाजण्याचे दरम्यान ग्यानमाता शाळेजवळ खाजगी इसम यांचे साई झेरॉक्स सेंन्टर, नांदेड येथे शासकीय पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी, सापळा पुर्व कार्यवाही करण्यात आली. या कारवाई दरम्यान खाजगी इसम साहेबराव नागोराव गुंडीले, वय 51 वर्ष, व्यवसाय झेरॉक्स सेंन्टर चालक, साई झेरॉक्स सेन्टर, ग्यानमाता शाळेजवळ, नांदेड ता. जि. नांदेड यांनी तक्रारदार यांना त्यांचे दोन मुलीचे जात वैधता प्रमाणपत्र काढण्यासाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी विभाग, नांदेड येथील साहेबाना बोलुन काम करून

देण्यासाठी दोन मुलीचे जात वैधता प्रमाणपत्र काढण्यासाठी 50,000/- रू. व एक मुलीचे जात वैधता प्रमाणपत्र काढण्यासाठी 25,000/- रू. मागणी केली व सध्या तुम्ही एकाच मुलीचे जात वैधता प्रमाणपत्र काढुन घ्या असे म्हणुन एका मुलीचे जात वैधता प्रमाणपत्र काढण्यासाठी 25,000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याची संमती दिली. वेळ 16.04 ते 16.51 वाजण्याचे दरम्यान खाजगी इसम साहेबराव गुंडीले यांनी त्यांचे साई झेरॉक्स सेंन्टर, नांदेड या त्यांचे दुकानात, ''काय विचार केल्या.....बघा विस दिवस तुम्हाला म्हणालो....जेवढ लवकर होईल तेवढ करतो....... समिती असते तीन लोकांची .......तीघ अधिकारी असतात.....एक अधिकारी राहील्यावर दोन लातुरला राहतात....... ते आले की हे निघुन जाते........समीती हाय तीन जनाची......एक लातुरला रहाते एक उस्मानाबादला.... तीघाला एकत्र करून घ्यावे हेच्यातच दिवस जातात..... घेतो घेतो मोजुन घेतो.... कोणाच कराच हाय ... देवीकाच काय? ''असे म्हणून अँन्थ्रासिनयुक्त लाचेची रक्कम 25000/- रूपये स्वतःचे टेबलचे ड्रॉव्हरमध्ये ठेवून घेवून स्वतःसाठी व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी विभाग, नांदेड येथील साहेबासांठी लाच स्विकारली आहे. म्हणून माझी खाजगी इसम साहेबराव गुंडीले यांचे विरुध्द कलम 7अ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

RAMDASH BABURAO SHEDGE(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

Bansode

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.विमानतळ,नांदेड

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** RAMDASH BABURAC

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**